एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक पर्यंत प्रवाशांना जाण्याकरीता एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट येथे जेट्टी व इतर सुविधा तयार करणे या कामाच्या रू.३९३.२३ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमआयएस ०७१८/प्र.क्र.१२३/बंदरे-२
गृह विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २० फेब्रुवारी, २०१९

वाचा :- मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे पत्र क्र. ममेबो/मुकाअ/अभि-४/नरीमन पॉ/३८७, दिनांक ३०.०६.२०१८

प्रस्तावना:

समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याचा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे. सदर स्मारक भर समुद्रात उभारण्यात येत असल्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांसाठी बोट सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत गेट वे ऑफ इंडिया येथे येणारे पर्यटक व बोटींची संख्या यामुळे वाहतुकीची कोंडी होत असते. तसेच जागेची मर्यादा आणि नौसेना यांच्याकडून सुरक्षेचे निर्देशामुळे तेथे विस्तारीकरणासाठी वाव नाही. तसेच गेट-वे-ऑफ इंडिया पासून स्मारकाचे अंतर सुमारे १४ कि.मी. अंतरावर आहे. ए.सी.पी.ए.नरीमन पॉईंट येथून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हे अंतर ३ किमी. आहे. त्यामुळे एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट, मुंबई येथे जेट्टी बांधणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने “एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक पर्यंत प्रवाशांना जाण्याकरीता एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट येथे जेट्टी व इतर सुविधा तयार करणे”, या कामाच्या रू.३९३,२२,९४,४४४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक पर्यंत प्रवाशांना जाण्याकरीता एन.सी.पी.ए. नरीमन पॉईंट येथे जेट्टी व इतर सुविधा तयार करणे या कामाच्या रू.३९३,२२,९४,४४४/- च्या अंदाजपत्रकास, केंद्र शासनाची मान्यता प्राप्त करण्याच्या अटीच्या अधीन

राहून, सागरमाला कार्यक्रमांतर्गत खालील तक्त्यात दर्शविलेल्या रकमेच्या मर्यादेत प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	**कामाचे नाव**	**किंमत**
१	Capital Dredging	३०,२२,१६,९९०/-
२	Beak Water	५८,४१,४४,१६३/-
३	Catamaran Berths/Wharf/Jetty	१,७६,३२,७५,८१२/-
४	Hover port Berth & Sea Plan	३९,८१,७५,९२८/-
५	Terminal Building & Allied work	१५,७६,२६,१२६/-
६	Paving/Parking/Roofing	४,६५,९७,९७६/-
७	Landscaping	३९,२४,९६३/-
८	Electrical Works	२५,३८,०५०/-
९	Fire Fighting	१,४६,४२,५९२/-
१०	Mechanical Works	२,५५,९२०/-
११	Other Infrastructure Facilities	२,१३,६०,१२६/-
	TOTAL	**३,२९,४७,५८,६४६/-**
	Add for PMC Charges (४%)	१३,१७,९०,३४६/-
	Add for Contangencies (४%)	१३,१७,९०,३४६/-
	Add for Labour Insurance (०.५ %)	१,६४,७३,७९३/-
	TOTAL	**३,५७,४८,१३,१३१/-**
	Add १०% for Escalation for year २०१९/२०	३५,७४,८१,३१३/-
	GRAND TOTAL	**३९३,२२,९४,४४४/-**

२. सदर कामास पर्यावरण तसेच इतर अनुषंगीक विभागांच्या आवश्यक परवानग्या घेण्यात याव्यात.

३. वरिल कामावरिल खर्च "मागणी क्र. बी-७, ३०५१ - बंदरे व दिपगृह ०२, लहान बंदरे, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य, (००) (०३) जेट्टीच्या बांधकामाकरिता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (राज्य हिस्सा ५०%) (३०५१ १८९१), ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान" या लेखाशिर्षाखाली मंजुर तरतुदीतून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या सागरमाला कार्यक्रमास मान्यता देणेबाबतच्या मा.मंत्रिमंडळाच्या दि.१९.०९.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आणि नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२४०/का.१४६१, दिनांक १८.१२.२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४३५/२०१८/व्यय-८, दिनांक २०.१२.२०१८ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२७११५४२५२१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hanmanlu Damayyawar

Digitally signed by Ashok Hanmanlu Damayyawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2bd0dc6138e4f3c9997616b47f0dc918cd4715f466afd0623c843397ffc06a09, serialNumber=2cc45c1c1345a8b6ff1e9fdbd2d12c6527f6d070c05b708bcc57b79b7ef3a95d, cn=Ashok Hanmanlu Damayyawar
Date: 2019.02.27 11:56:30 +05'30'

(अ. ह. दमय्यावार)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
२. मा. राज्यमंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
४. प्रधान सचिव (बंदरे), मंत्रालय, मुंबई,
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का. १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. निवड नस्ती (बंदरे-२)